# डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे

**फर्ग्युसन महाविद्यालय परिसर , पुणे ४११ ००४**

वेबसाईट : www. despune.org टेलिफोन नं. : ०२०-६७८७६०९०

स्थापना १८८४

**डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे** अंतर्गत पुणे येथील वसतिगृहासाठी **'वसतिगृह पर्यवेक्षक'** ( **विना अनुदानित)** पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारक उमेदवारांकडून खालील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून अर्ज मागावण्यात येत आहेत.

| पदनाम | अर्हता | प्राधान्य |
|---|---|---|
| वसतिगृह पर्यवेक्षक<br>Hostel Supervisor | पदवीधर<br>Graduate | कला , क्रीडा, सामाजिक क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी<br>विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची कला<br>प्रसंगी सर्व प्रकारची कामे करण्याची तयारी<br>संगणकीय कामे हाताळण्याची क्षमता<br>तत्सम पदी कामाचा पूर्वानुभव |

**वसतिगृह पर्यवेक्षक पदाची कर्तव्ये :**

१] विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पार पाडणे.
२] विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी वेळोवेळी संवाद साधणे.
३] विद्यार्थ्यांच्या वर्तणूकीच्या नोंदी ठेवणे.
४] गरजे नुसार विद्यार्थ्यांचे समुपदेशन करणे व आवश्यकता भासल्यास वरिष्ठांकडे अथवा विशेष समुपदेशनासाठी पाठवणे.
५] वसतिगृहाच्या देखभाली कडे लक्ष देणे.
६] वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यक्रम वसतिगृह प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करणे.
७] आवश्यक ते कार्यालयीन कामकाज सांभाळणे.
८] वसतिगृहातील मेस बाबत तक्रारी असल्यास त्याची शहानिशा करून वसतिगृह प्रमुखांच्या निदर्शनास आणणे.
९] विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूक असणे.

**महत्वाचे : सूचना / अटी शर्ती**

१. उमेदवारांनी सदर पदासाठीचा आपला अर्ज (Biodata) निर्धारित कालावधीत **des.hostel@despune.org** या ईमेल वर पाठवावा. इतर कोणतीही कागदपत्रे जोडू नयेत.

२. अर्ज करण्याचा अखेरचा दिनांक : संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवस असेल.

३. उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी की, उपरोक्त सर्व पदे कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर आहेत. नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांची संस्थेच्या प्रशासकीय सोयीसाठी संस्थेच्या इतर कोणत्याही घटक संस्थेमध्ये बदली केली जाऊ शकते.

४. उमेदवाराने अर्ज काळजीपूर्वक व पूर्णपणे भरणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सदर भरलेल्या माहितीबाबत अथवा जमा केलेल्या कागदपत्रा विषयी भविष्यात तक्रार उद्भवल्यास संबंधित उमेदवार त्यास पूर्णपणे जबाबदार असेल.

५. उमेदवाराने अर्जामध्ये माहिती भरत असताना पत्रव्यवहारासाठी अचूक पत्ता, कार्यान्वित असलेला अचूक भ्रमणध्वनी ( Mobile No.) क्रमांक व ई – मेल आय. डी. नमूद करावा जेणेकरून उमेदवारांशी संपर्क करून आवश्यक त्या सूचना देणे सुलभ होईल.

६. उमेदवार निवडी संदर्भात अंतिम अधिकार पूर्णपणे संस्थेचा असेल व याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

दिनांक : ०१.०३.२०२४
पुणे

कार्यवाह,
डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे